PAGE NO:
DATE:





श्री. अशोक केशवराव चंदनपूरकर
१, श्रीराम कृपा अपार्टमेंट
गल्ली क्र. ५, डहाणूकर कॉलनी
कोथरूड, पुणे 411038
मोबा: 7588288102

दि. २७/०६/2022

मा. डॉ. आदित्य केळकर

सस्नेह नमस्कार वि. वि.

माझ्या मित्रांची व त्यांच्या कुटुंबियांची मोतीबिंदूची अनेक ऑपरेशनस् (डॉ. आदित्य केळकर) सरांनी) आपण केलेली आहेत. हे मला माहित होते. आपणहि ~~ह~~ त्यांच्याकडून मोतिबिंदूची ऑपरेशनस् करून घेऊ, असे मी ठरविले. पण ते सारखे लांबत जात होते. चालतानां, रिक्षामध्ये बसतानां व उतरताना मला त्रास होतो. म्हणून डोळे तपासणे लांबत गेले. असे माझ्या मुलीने सौ. वीणा जोशी हिने तिचा तिची मैत्रिण सौ. रेखा देशपांडे हिला सांगितले, तिने ते लागलीच डॉ. आदित्य केळकर सरांच्या कानावर घातले. त्यांनी लागलीच श्री. डॉ. हर्ष यांना ४-५ नेत्र तपासणी उपकरणां सहित आमच्या घरी पाठविले.

श्री. डॉ. हर्ष यांनी आल्यावर माझ्या डोळ्यांत ड्रॉप टाकले व सुमारे तासभर दोन्ही डोळ्यांच्या विविध ~~[illegible]~~ तपासण्या केल्या. अत्यंत सेवाभावी वृत्तीने व आपुलकीने त्यांनी दोन्ही डोळे तपासले. दोन्ही डोळ्यांच्या मोती बिंदूचे ऑपरेशन ८-८ दिवसांच्या अंतराने करू असे सांगितले.

त्याकरिता त्यांना विविध तपासण्या करून घेण्यासाठी कागदावरून लिहून दिले. माझे डोळे तपासण्यासाठी त्यांनी कोणतेहि शुल्क त्यांनी त्यांचे संस्थेने आमच्याकडून घेतले नाही. आम्ही आचंबित झालो.

नाव नोंदणीसाठी व डोळे तपासण्यासाठी रिक्षातून उतरताच N.I.O. संस्थेच्या गेटमधून आत प्रवेश केला. तेथिल सिक्युरिटीच्या कर्मचाऱ्यांने तात्काळ व्हील चेअर समोर आणून

बसण्यास सांगितले. नाव नोंदणी, डोळे तपासणे व इतर सोपस्कारांसाठी एका मजल्यावरील हॉलमध्ये प्रवेश केला. सर्व कर्मचारी कामात व्यग्र होते. काहींची लगबग जाणे-येणे चालू होते

नेत्र रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना सेवाभावी वृत्तीने व जिव्हाळ्याने ते माहिती सांगत होते. संबंधित विभागाकडे घेऊन जात होते सगळे शांतपणे सुरळीतपणे चालू होते. गलका, गोंधळ, गडबड यांचा लवलेशही नव्हता. विविध उपकरणांच्या सहाय्याने माझ्या अनेक तपासण्या झाल्या. काही पुन्हा पुन्हा झाल्या असल्यान याकरिता 3-4 मजल्या मधून फिरावे लागले. सगळीकडे कमालीची शिस्त बघता होती. अदृश्यपणे प्रशासकिय यंत्रणेची स्पंदने सगळीकडे जाणवत होती. सर्व कर्मचारी वर्ग तत्पर मितभाषी, व मृदुभाषी होता. कोणीही रेंगाळताना, गप्पा मारताना दिसला नाही. दोन्ही ऑपरेशनच्या वेळी तत्पर व विनम्र सेवा आम्हाला अनुभवण्यास मिळाली. माझ्या मुलीची मैत्रिण सौ. रेखा देशपांडे हिचे वेळोवेळी मौलिक सहकार्य मिळत गेले.

मा. डॉ. आदित्य केळकर सरांनी अतिशय टाळावेत ही हंबल रिव्हबेरेट. डॉ. जोशिमता. डॉ. मोनिका डे विजय यांनी मला मोलाचे मार्गदर्शन केले

मा. डॉ. आदित्य केळकर सरांना व N.O. संस्थेस सुंदर सुंदर शुभेच्छा! व अनेकानेक शुभाशीर्वाद. डॉ. आदित्य केळकर सरांची व संस्थेची कीर्ती दिगंत पसरो तसेच त्यात उत्तरोत्तर भरभराट व प्रगती होवो हि परमेश्वरचरणी प्रार्थना!

माझे वय वर्षे ८२ हे लक्षात घेऊन मला कोणत्याहि प्रकारे शारिरीक त्रास होऊ नये म्हणून मा. डॉ. आदित्य केळकर सरांनी डॉ. हर्ष यांना माझ्या घरी होम व्हिजीट चेकींगसाठी ताबडतोब पाठविले. त्या बद्दल शतशः धन्यवाद!

आपला स्नेहांकित

अ. के. चंदनपूरकर

(श्री अशोक केशवराव चंदनपूरकर)

MRD No - 155585